आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

मंगळवार दिनांक ०१ एप्रिल २०२५

ठळक बातम्या

- सर्वसामान्य नागरिकांचा रिझर्व बँकेवरचा दृढ विश्वास ही मौलिक ठेव असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन.
- वडसा-देसाईगंज-गडचिरोली या रेल्वे मार्गासाठी 1 हजार 886 कोटी रुपयांच्या सुधारित खर्चास आजच्या मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता.
- मार्चमध्ये मालवहनाच्या कार्यात मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाचा महसूल निर्मितीचा विक्रम.
- नागपूरच्या आयसोलेशन हॉस्पीटल परिसरात बनणार केंद्रीय औषधी साठवणूक केंद्र - महानगरपालिका आयुक्तांनी केली जागेची पाहणी.
- अमरावती, यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यात उद्या वादळी पर्जन्यमानासह अवकाळी पावसाचा ऑरेंज अलर्ट.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

भारतीय रिझर्व्ह बँकेशी सामान्य नागरिकांचा थेट संबंध येत नसला, तरी त्यांच्या सर्व आर्थिक देवाणघेवाणी रिझर्व्ह बँकेच्या अखत्यारीत येतात, त्यामुळे देशाच्या सर्व नागरिकांचा रिझर्व बँकेवरचा दृढ विश्वास ही मौलिक ठेव आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ९०व्या स्थापनादिन सोहळ्याच्या समारोप कार्यक्रमात त्या मुंबईत बोलत होत्या. डिजिटल व्यवहारांमध्ये भारताला जागतिक पातळीवर महत्त्वाचं स्थान मिळवून देण्यात आरबीआयनं महत्त्वपूर्ण भूमिका निभावली असल्याचं त्या म्हणाल्या,

***The RBI has played a key role in making India a global leader in digital payments. By continuously modulising the countries payment infrastructure, it has ensured that digital transactions are not only seamless and efficient but also secure.***

प्रचंड गरीबीपासून ते जगातल्या महत्त्वाच्या अर्थव्यवस्थांमधे स्थान मिळवणाऱ्या भारताचा संपूर्ण प्रवास रिझर्व्ह बँकेनं बघितला आहे. फसवणुकीच्या वाढत्या

घटना, सायबर धोके याचा सामना रिझर्व्ह बँक तत्परतेनं करत असल्याचंही राष्ट्रपतींनी नमूद केलं. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ९०व्या वर्षपूर्तीनिमित्त विशेष 'माय स्टॅम्प'चं अनावरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते यावेळी झालं. बदलतं तंत्रज्ञान आणि जागतिक आर्थिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारतीय रिझर्व्ह बँकेकडून सातत्यपूर्ण नेतृत्व आणि दूरदृष्टीची अपेक्षा देशाला आहे, असं केंद्रीय दूरसंवाद मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यावेळी म्हणाले. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनं आगामी दशक अतिशय महत्त्वाचं असून आर्थिक समावेशन, ग्राहक सुरक्षा आणि आर्थिक प्रगतीसाठी भारतीय रिझर्व्ह बँक वचनबद्ध आहे, अशी ग्वाही गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी स्वागतपर संबोधनात दिली. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासह इतर मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

अमित शाह

नक्षलवाद मुक्त भारत घडवण्याच्या दृष्टीनं सरकारनं मोठी प्रगती केली असून, नक्षलप्रभावित जिल्हयांची संख्या बारा वरुन सहा झाली असल्याचं, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. नक्षलवादाविरोधात कठोर कारवाई करत एक सशक्त, सुरक्षित आणि समृद्ध भारत घडवणं आणि देशाचा सर्व व्यापक विकास करणं, यासाठी सरकार काम करत असल्याचं, त्यांनी सामाजिक माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. पुढच्या वर्षाच्या मार्च अखेरपर्यंत देशातून नक्षलवादाचं समूळ उच्चाटन करण्याचा सरकारचा निश्चय असल्याचंही शहा यांनी या संदेशात म्हटलं आहे.

वेव्हज परिषद

मुंबईत होणाऱ्या वेव्हज परिषदेच्या दरम्यान वेव्हज बाजारचंही आयोजन केलं जाणार आहे. यात चित्रपट, टीव्ही, ॲनिमेशन, VFएक्स, गेमिंग आणि कॉमिक्स यासारख्या क्षेत्रातील दिग्गज एकत्र येणार आहेत. यात भागिदारी, व्यवसाय विस्तार यासारख्या गोष्टींवर चर्चा होईल. त्यासाठी प्रक्षेपण व्यवस्था, खरेदीदार विक्रेते यांच्यात बैठका, आंतर-देशीय भागिदारी यासाठी व्यवस्था उपलब्ध असेल. www.wavesbazaar.com या संकेतस्थळावर याविषयी अधिक माहिती उपलब्ध आहे.

मंत्रीमंडळ निर्णय

गडचिरोली जिल्ह्यातील वडसा-देसाईगंज-गडचिरोली या रेल्वे मार्गासाठी **1** हजार **886** कोटी रुपयांच्या सुधारित खर्चास आज च्या मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यातील **943.025** कोटी इतकी **50%** रक्कम राज्य सरकार देणार आहे. याशिवाय गडचिरोली जिल्ह्यातील प्रमुख खनिज आणि विशिष्ट औद्योगिक गौण खनिजाच्या व्यवस्थापनासाठी गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण स्थापन करण्यासाठीच्या प्रारूप अधिनियमास देखील मान्यता देण्यात आली आहे. अजनी**,** नागपूर इथल्या देवनगर को-ऑप. हाऊसिंग सोसायटी च्या जागेवरील क्रीडांगणांचे आरक्षण रहिवासी करण्याचा निर्णय देखील आज घेण्यात आला.

मध्य रेल्वे

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने गेल्या महिन्यात अर्थात मार्चमध्ये मालवहनाच्या कार्यात उल्लेखनीय कामगिरी केली असून यातून महसूल निर्मितीचा एक नवीन विक्रम नोंदवला आहे. विभागाने मार्च महिन्यात **465.18** कोटींचे मालवाहतुकीची कमाई केली असून, यात **1,185** रेक लोड करण्यात आले. आर्थिक वर्ष **2024-25** मध्ये विभागाची एकूण मालवाहतूक कमाई **4733.22** कोटी इतकी आहे. आर्थिक वर्षात सर्वाधिक सिमेंटचे वहन करण्यात आले. एसीसी सिमेंट स्लाइडिंग घुगुस इथं **442** रेक आणि रिलायन्स सिमेंट प्रायव्हेट लिमिटेड मुकुटबन इथं **387** रेक या दरम्यान पोहोचवण्यात आले.

केंद्रीय औषधी साठवणूक केंद्र

नागपूर महानगरपालिकेद्वारे आयसोलेशन हॉस्पीटल परिसरामध्ये केंद्रीय औषधी साठवणूक केंद्र साकारले जाणार आहे. या प्रस्तावित कार्यासंदर्भात मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी आज इमामवाडा इथल्या आयसोलेशन हॉस्पीटल परिसराची पाहणी केली व आवश्यक सूचना नोंदविल्या. मनपा आयुक्तांनी आयोसोलेशल हॉस्पीटल परिसरात प्रस्तावित औषधी साठवणूक केंद्राच्या इमारती संदर्भात माहिती जाणून घेतली. येथील १५ हजार वर्ग फुट जागेमध्ये केंद्रीय औषधी साठवणूक केंद्र तयार करण्याचे प्रस्तावित आहे. या केंद्रामधून मनपाचे सर्व रुग्णालय तसेच सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र**,** आरोग्य वर्धिनी केंद्र येथे औषधांचा पुरवठा करण्यात येईल. सदर प्रस्तावित

इमारतीमध्ये महत्वाच्या बैठकीसाठी सभागृह तसेच कार्यालय देखील तयार केले जाणार असल्याची माहिती यावेळी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनी आयुक्तांना दिली.

हवामान

विदर्भात उद्या अमरावती, यवतमाळ आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह तुरळक ठिकाणी पाऊस आणि गारपीट होण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. याशिवाय उर्वरित जिल्ह्यांमध्ये जसं वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली अकोला, बुलढाणा आणि वाशिम या ठिकाणी सतर्कतेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तत्पूर्वी, आज देखील भंडारा आणि गोंदिया जिल्हा वगळता विदर्भाच्या उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमानाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला होता. नागपुरात देखील सकाळपासून ढगाळ वातावरण होतं. दरम्यान, चंद्रपूर जिल्ह्यात आज **42** अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं. नागपुरात आज **39.9** अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं.

हेडगेवार जयंती

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आद्य सरसंघचालक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार यांची आज जयंती आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डॉक्टर हेडगेवार यांना आदरांजली वाहिली.

अवैध तंबाखू,

मध्यप्रदेशा मधून भंडारा जिल्ह्यात अवैध रित्या तंबाखू, गुटखा वाहतूक केली जात असल्याची गुप्त माहिती भंडारा जिल्ह्यातील सिहोरा पोलिसांना मिळाली. पोलिसांनी गुटका जप्त करून याची माहिती अन्न आणि औषध प्रशासनाला देण्यात दिली. अखेर कोर्टाच्या आदेशानुसार दोन लाखांचा तंबाखू, गुटखा सिहोरा पोलिसांनी जाळून नष्ट केला आहे.

वक्फ सुधारणा

वक्फ सुधारणा विधेयकाचं उद्दिष्ट कोणाची संपत्ती जप्त करणं, हे नसून, न्याय देणं, हे आहे, असं केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी म्हटलं आहे. आज संसदभवनाच्या बाहेर पत्रकारांशी संवाद साधतांना त्यांनी, याबाबतीत विरोधी पक्ष जनतेची दिशाभूल करत असल्याचा आरोप केला. दुसरीकडे, काँग्रेस खासदार उज्ज्वल रामन यांनी, हे विधेयक घाईगडबडीनं पारित न करता यावर विस्तृत चर्चा व्हायला पाहिजे, असं मत व्यक्त केलं.

शेयर बाजार

नव्या आर्थिक वर्षाला आजपासून सुरुवात झाली असून पहिल्याच दिवशी भारतीय शेअर बाजारात तीव्र घसरण झालेली पहायला मिळाली. सकाळी बाजार सुरू झाल्यानंतर काही वेळातच मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स १ हजारांहून अधिक अंकांनी घसरला तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी तीनशेहून अधिक अंकांनी घसरला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प विविध कर आणि शुल्क लावण्याच्या घोषणा करत असल्याच्या पार्श्वभूमीवर तसंच जागतिक पातळीवर इंधन तेलांचे दर वाढत असल्यानं त्याचा एकंदर परिणाम भारतीय शेअर बाजारावर दिसून येत असल्याचं बाजार वर्तुळात बोललं जात आहे.

*****